Sakal,Pune, January 21, 2015 Pp.4

# विज्ञान कथेवरील टीका अयोग्य

## ‘माझे विज्ञान कथा विश्व’वर व्याख्यानात डॉ. जयंत नारळीकर यांचे मत

**पुणे, ता. २० :** ‘‘आजच्या विज्ञान कथा उद्याच्या वास्तवात परावर्तित होऊ शकतात. मात्र, प्रस्थापित विज्ञानाला धक्का देणाऱ्या कथा लिहिणे अयोग्य आहे. त्याचप्रमाणे विज्ञान कथा न वाचता त्यावर वरवरची टीका केली जाते. परिणामी, विज्ञान कथेवरील टीकेचा दर्जा खालवतो. म्हणूनच आता विज्ञान कथेवर टीका करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे.’’ असे मत ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले आहे.

८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संयोजन समितीतर्फे ‘माझे विज्ञान कथा विश्व’ या विषयावर डॉ. नारळीकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या वेळी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, मंगला नारळीकर, संयोजक संजय नहार, स्वागताध्यक्ष भारत देसडला उपस्थित होते.

जगभरातील विज्ञान कथेचे विश्व डॉ. नारळीकर यांनी उलगडले. ते म्हणाले, ‘‘इंग्रजी साहित्यात गेल्या दोन शतकांपासून विज्ञान कथा हा साहित्य प्रकार रूढ आहे. आपल्याकडे आजही हा साहित्य प्रकार तसा नवीन आहे. इतर साहित्य प्रकारापेक्षा विज्ञान कथा हा प्रकार वेगळा असल्यामुळे त्यावर होणाऱ्या टीकेचेही काही ठोस निकष ठरवून दिले पाहिजेत. विज्ञान कथा फसली, की यशस्वी ठरली हे सांगणे या निकषाच्या आधारे शक्य होईल.’’

विज्ञानविषयक साहित्याबद्दल डॉ. नारळीकर म्हणाले, ‘‘नवे शोध, शोधाचा आढावा घेणारे, जनसामान्यांना विज्ञानाची माहिती देणारे, विश्वकोशात्मक पद्धतीने विज्ञानाची थोडक्यात माहिती देणे आणि विज्ञान कथा असे विज्ञानविषयक साहित्याचे विविध प्रकार आहेत. यामध्ये नवे शोधाविषयक तांत्रिक माहिती देण्याचा प्रकार किचकट वाटत असला, तरीही सोपा आहे. त्या तुलनेत जनसामान्यांना विज्ञानाची माहिती करून देणारे लिखाण हे वाचता सोपे वाटत असले, तरीही ते लिहिणे तितकेच अवघड आहे. विज्ञान कथा लिहिणे हा सगळ्यात अवघड साहित्य प्रकार आहे.’’ या वेळी पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी यांनी केले.



शिवाजीनगर : एकीकडे भविष्याचा वेध घेणारे संशोधक...अन् दुसरीकडे इतिहास संशोधक एकमेकांना आदरपूर्वक प्रणाम करताना. (डावीकडून) डॉ. जयंत नारळीकर आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे.